# जन आरोग्य अभियान, महाराष्ट्र











संपर्क

डॉ. अनंत फडके

९४२३५३१४७८

तृप्ती मालती

९४२२३०८१२६

काजल जैन

९९७०२३१९६७

शैलजा आराळकर

९४२३०१७३१७,

सायली सविता

९८३४२९१५६३

डॉ. सुहास कोल्हेकर

९४२२९८६७७१

डॉ. सतीश गोगुलवार

९४२२१२३०१६,

डॉ. मधुकर गुंबळे

९४२२१९०८११

शकुंतला भालेराव

९८५०२५४६७९

----------------

-ईमेल- janarogyaabhiyan@gmail.com

----------------

-फेसबुक- www.facebook.com/janarogya

----------------

# जन आरोग्य अभियान, महाराष्ट्र

अनेक आरोग्य व विज्ञान संघटना/संस्था, स्त्री संघटना, कष्टकऱ्यांच्या वेगवेगळया विभागांना संघटित करणाऱ्या संघटना अशा विविध प्रकारच्या राष्ट्रीय पातळीवरील अठरा संस्था-संघटनांनी एकत्रित येऊन 'जन स्वास्थ अभियान'ची राष्ट्रीय सुसूत्रीकरण समिती बनवली आहे. त्यांच्या माध्यमातून 'जन-आरोग्य सनद' चळवळीची परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी भारतातील सुमारे 200 संस्था-संघटना 'जन स्वास्थ अभियाना'चा भाग आहेत.

जन स्वास्थ अभियान ही संविधानाला मानणारी, धर्मनिरपेक्षतता व विवेकवादाचा पुरस्कार करणारी आणि जात, धर्म, लिंग, भाषा, प्रदेश, उत्पन्न यापलीकडे जाऊन सर्वांना आरोग्यसेवेचा अधिकार मिळायला हवा अशी मागणी करणारी संघटना आहे. या राष्ट्रीय पातळीवरील संघटनेच्या व्यापक बॅनरखाली देशात अनेक राज्यात सक्रिय संस्था/संघटना काम करीत आहेत. महाराष्ट्रात जन आरोग्य अभियान या नावाने साधारण ५० जन संघटना/संस्था सक्रिय पद्धतीने सन २००० सालापासून काम करीत आहेत.

महाराष्ट्रात सरकारी रुग्णालयांतील आरोग्य सेवा सुधारावी, लोकांना औषधे व उपचार मोफत मिळावेत, रुग्णालये जनतेला उत्तरदायी व्हावीत, धर्मादाय रुग्णालयांकडून गरीब रुग्णांना मोफत उपचार मिळावेत, खाजगी रुग्णालयांवर नियंत्रणाचा व रुग्ण हक्कांचा कायदा महाराष्ट्रात बनवला जावा, खासगी रुग्णालयांची नफेखोरी कमी व्हावी अशा अनेक मुद्द्यांवर जन आरोग्य अभियान हक्काधारित दृष्टीकोनातून काम करत आहे.

# जन आरोग्य अभियानाची उद्दिष्टे

- आरोग्य सेवा हा घटनात्मक हक्क बनण्यासाठी प्रयत्न करणे.
- आरोग्य हा विषय सामाजिक, राजकीय चर्चेचा विषय करणे.
- आरोग्य सेवा मिळण्यासाठी सार्वजनिक आरोग्य सेवा बळकट व लोकाभिमुख करणे.
- सरकारी आरोग्य सेवांचे कार्यक्रम नीट चालले पाहिजेत यासाठी प्रयत्न करणे.
- व्यापक जनसंवादाद्वारे 'सर्वांना आरोग्य' प्रत्यक्षात का आले नाही यावर चर्चा होऊन ठिकठिकाणचे आरोग्याचे प्रश्न वेशीवर टांगणे.
- स्त्रिया आणि इतर उपेक्षित घटकांच्या आरोग्याबद्दल जनजागृती करणे. सर्व प्रकारच्या आरोग्य सेवा संवेदनशील होण्यासाठी प्रयत्न करणे.
- खासगी वैद्यकीय सेवेत जिथे अशास्त्रीय-अनैतिक पध्दती आणि फसवणूक होत असेल ती बंद व्हावी; या सेवेवर सामाजिक व स्वनियंत्रण प्रस्थापित व्हावे.
- आरोग्याच्या क्षेत्रात वर्चस्ववादी जागतिकीकरणाला जनवादी पर्याय मांडणाऱ्या आणि आरोग्यदायी विकासासाठी काम करणाऱ्या जनचळवळी व संस्था एकत्र याव्यात.
- 'जन-आरोग्य सनदे'च्या आधारे आरोग्याबाबतच्या विविध प्रश्नांवर जनवादी भूमिका मांडणे व त्यानुसार कार्यक्रम घेणे.

या उद्देशाने गावपातळीपासून सरकारी, धोरणात्मक पातळीपर्यंत संवाद, जागृती, समर्थन, संघर्ष अशा विविध माध्यमातून 'जन आरोग्य अभियान' काम करत आहे.

## 'जन आरोग्य अभियाना'ची महाराष्ट्रातील वाटचाल

### महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणा बळकटीकरणासाठी विविध अभियाने-

- आरोग्य व आरोग्य सेवा या संदर्भातील वेगवेगळ्या विषयांवर जनमानसात शास्त्रीय आणि हक्काधारित दृष्टीकोनातून सर्वांना समजेल अशा भाषेत माहिती तयार करून, सातत्याने व्यापक जनजागृती, लोकशिक्षण, प्रशिक्षणे महाराष्ट्रातील विशेषत: ग्रामीण भागातील सार्वजनिक आरोग्य सेवा सुधारण्यासाठी नियमितपणे राज्य आरोग्य यंत्रणा, प्रसारमाध्यमे, लोकप्रतिनिधी यांच्यापुढे ठोस सूचना मांडून त्याचा पाठपुरावा.
- महाराष्ट्रातील वेगवेगळ्या सामाजिक क्षेत्रात हक्काधारित दृष्टीकोनातून काम करणाऱ्या नेटवर्क/जन संघटना (अन्न-अधिकार अभियान, जगण्याच्या हक्काचे आंदोलन) यांच्याबरोबर एकत्रितपणे विविध मोहिमा.
- सार्वजनिक आरोग्य सेवेत औषधांचा सततचा तीव्र तुटवडा थांबला पाहिजे या मागणीसाठी विविध मोहिमा.
- महाराष्ट्रातील कुपोषण व आरोग्याच्या काही अतिशय गंभीर आणि महत्त्वाच्या मुद्द्यांवर लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न, औचित्याचा मुद्दा, अल्प-चर्चा अशा विविध संसदीय व्यासपीठांच्या माध्यमातून विधी मंडळात चर्चा घडवून आणण्यासाठी प्रयत्न (२०१५,२०१६,२०१७)
- राज्यातील आरोग्यसेवेचे न धोरणात्मक प्रश्न आणि मागण्या घेऊन उन्हाळी, हिवाळी आणि पावसाळी अधिवेशनादारम्यान मा. आमदार आणि मा. मंत्री यांना प्रत्यक्ष भेटून चर्चा (२०१५.२०१६,२०१७,२०१८)
- महाराष्ट्र राज्यात सेवा हमी कायद्याच्या मसुद्यावर सूचना देण्यासाठी चर्चा व त्याभोवती अभियान (२०१५)
- राष्ट्रीय मानव अधिकार आयोग आणि जन स्वास्थ अभियान संयुक्तपणे महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थान या राज्यातील रुग्ण हक्कांचे उल्लंघन झालेल्या व्यक्ती व राज्य सरकार यांच्यामध्ये पश्चिम विभागीय जन-सुनवाई (२०१६)
- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत २९७ कोटीचा औषध खरेदी घोटाळ्यावर सर्वांगाने उपाययोजना सुचवण्याबाबतचे वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धीसाठी निवेदन (२०१६)
- महाराष्ट्रात कुपोषणाचे वाढते प्रमाण आणि त्यासाठीच्या बजेटमध्ये कपात केल्याचा निषेध करणारे वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धीसाठी निवेदन (२०१६)
- अंगणवाडी सेविकांच्या मागण्यांना जन आरोग्य अभियानाचा पाठिंबा देणारे वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धीसाठी निवेदन (२०१६)
- वर्ष २०१६-१७, २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र राज्य सरकारने आरोग्य विभागाच्या बजेटमध्ये केलेल्या कपातीबाबत वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धीसाठी निवेदन (२०१६,२०१७)
- महिला व बाल विकास खात्याने अति कुपोषित मुलांना अंगणवाडीमध्ये ताजे गरम अन्न देण्याऐवजी पाकीटबंद एनर्जी न्युट्रिशन फूड खरेदी करण्याबद्दलच्या निर्णयाला विरोध करणारे निवेदन (२०१७)
- सार्वजनिक आरोग्य सेवेतील धोरणात्मक प्रश्न मांडण्यासाठी हिवाळी अधिवेशनात विधीमंडळावर मोर्चा (२०१७)
- किसान सभेने राबविलेल्या राज्यव्यापी शेतकरी आंदोलनाला पाठिंबा आणि शेतकऱ्यांच्या आरोग्याचे प्रश्न व त्याबद्दलच्या मागण्यांचा ठराव (२०१७)

- राज्यातील आरोग्यसेवेचे अनेक प्रश्न न सुटल्याने आणि त्यामुळे वैयक्तिक आयुष्यात आरोग्याची हानी झालेले, कुटुंबीय दगावल्याच्या घटना घडलेले अनेक संतप्त, हैराण रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांचा नागपूर, पावसाळी अधिवेशानादारम्यान ‘रुग्णांचा सत्याग्रह’ (२०१८)

## महाराष्ट्रातील खासगी आरोग्य क्षेत्रासंदर्भातील अभियाने

- शहरी आरोग्य सेवेबद्दल पुण्यातील महानगरपालिकेच्या जोर्वेकर, दळवी हॉस्पिटलच्या खासगीकरणाला विरोध जनहित याचिका व आंदोलने (२००८) ससून हॉस्पिटलमध्ये क्षयरोग्यांसाठीच्या खाटा कमी करण्याला यशस्वी विरोध तसेच ससूनच्या खासगीकरणाच्या विरोधात आंदोलने (२००७)
- जन आरोग्य अभियान, रुग्ण हक्क समिती आणि इंडियन मेडिकल असोसिएशन द्वारा आयोजित पहिली रुग्ण हक्क परिषद (२०११)
- 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट कायद्या'चा मसुदा बनवणाऱ्या समिती सदस्यांबरोबर जनतेचा, सामाजिक संघटनांचा आणि कार्यकर्त्यांचा संवाद कार्यक्रम व पत्रकार परिषदा (२०१४)
- जन आरोग्य अभियान व महाराष्ट्रातील विविध सामाजिक संघटनांचे महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट बिल २०१४ बाबत राज्यातील सर्व ८ आरोग्यसेवा उपसंचालक परिमंडळ कार्यालयात राज्यभर निवेदने व पत्रकार परिषद (२०१४)
- खासगी आरोग्य विमा कंपन्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्वास्थ्य बिमा योजनेला बंद करण्याबाबतचे निवेदन आणि पत्रकार परिषद (२०१४)
- पुणे प्रादेशिक मानसिक रुग्णालयातील गैरप्रकार, अनास्था व त्यामुळे असहाय्य रुग्णांचे हाल यावर आवाज उठविण्यासाठी आंदोलन (२०१५)
- खासगी हॉस्पिटलमधील दर नियमनाची गरज प्रस्तावित महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट कायद्यात कोणत्या तरतुदी असाव्यात?' यावर चर्चासत्र व पत्रकार परिषद (२०१५)
- सरकारी व खासगी रुग्णालयांमध्ये रुग्ण हक्कांचे संरक्षण करणारा कायदा महाराष्ट्र राज्यात यायला पाहिजे यासाठी 'आरोग्य मंत्र्यांना फॅक्स पाठवा' अभियान (२०१५)
- प्रामाणिक सेवा देणाऱ्या डॉक्टरांप्रती डॉक्टर्स डे निमित्ताने कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नागरिकांची प्रामाणिक डॉक्टर्सना ‘प्रिय डॉक्टर’ हे पत्र देण्याची मोहीम (२०१५)
- 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट कायदा’ लवकर पारित करण्यासाठी मा. मुख्यमंत्री व मा. आरोग्यमंत्री यांना SMS पाठवा अभियान (२०१६)
- रुग्ण हक्कांचे संरक्षण करण्यासाठी 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट कायदा’ लवकर पारित करण्यासाठी 'आवाज रुग्णांचा, निर्धार जनतेचा!' मोहीम व त्यामध्ये २१,००० पुणेकरांनी कायदा पारित होण्याच्या बाजूने मतदान व त्याचे निवेदन मा. मुख्यमंत्री व आरोग्यमंत्री यांना देण्याची मोहीम (२०१७)

## तुम्ही कशाप्रकारे या अभियानात सामील होऊ शकता?

- अभियानातील संस्था/संघटनांच्या संपर्कात राहून माहिती मिळवणे, अभियानातील कार्यक्रमात सक्रिय सहभागी होणे.
- आपल्या कार्यक्षेत्रातील इतर लोकांशी मोठ्या प्रमाणावर संपर्क करणे, त्यांना सक्रिय करणे.
- एकीकडे जनजागरण व दुसरीकडे आरोग्य सेवा सुधारण्यासाठी सरकारवरती दबाव आणणे यासाठी पुढाकार व संसाधन निर्मिती करणे.
- अभियानामार्फत सरकारी व खासगी आरोग्य सेवांची माहिती गोळा करणे.
- सोशल मीडियामध्ये जन आरोग्य अभियान अंतर्गत येणारी माहिती, मोहिमा, कार्यक्रम जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवण्यासाठी पुढाकार घेणे.
- जन आरोग्य अभियानामध्ये कार्यक्रम व मोहिमा घेण्यासाठी निधी उभा करणे.

******************